महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी कार्यालय

ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY



प्रेसनोट दि. २१.०९.२०२६

जबरी चोरी करणारे आरोपींना गुन्हे शाखेकडुन २४ तासाचे आंत अटक करुन त्यांचेकडुन ३६,४८,०००/—रु मुद्देमाल हस्तगत केलेबाबत...

दि. १५/०९/२०२६ रोजी दुपारी ०१.०५ वाजताचे सुमारास उल्हासनगर येथील क्रांती फुड एजन्सीचे दोन कर्मचारी एजन्सीचे ४० लाख रुपये बॅक ऑफ बडोदा, कल्याण पश्चिम या शाखेत भरणा करणेसाठी सहजानंद चौकाकडुन लालचौकीकडे जात असताना, त्यांचेवर पाळत ठेवणारे २ मोटार सायकलवरील ४ अनोळखी इसमांनी एजन्सीचे कर्मचारी यांचे स्कुटीला लाथ मारुन त्यांना खाली पाडुन त्यांना मारहाण करुन त्यांचेकडील ४० लाख रुपये असलेली बॅग जबरीने हिसकावुन जबरी चोरी केलेबाबत फारूख इस्माईल अत्तार वय ६२ वर्षे रा.कल्याण पश्चिम यांनी दिलेल्या तक्रारीवरून बाजारपेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. २७०/२०२६ बीएनएस २०२३ चे कलम ३०९(६), ३(५), ६१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखेकडुन करण्यात येत होता. गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने अथक परीश्रम करुन जबरी चोरी करणारे व जबरी चोरीचा कट रचणारे आरोपीत नामे १) समीर अख्तर शेख वय २८ वर्षे रा. वाघचौरे चाळ, रूम नंबर ०३ बुदध विहारजवळ, अशोकनगर,वालधुनी कल्याण पुर्व २) आफताब अस्लम खान वय २५ वर्षे रा. शेख चाळ, रूम नंबर ०६, महागिरी कोळीवाडा, ठाणे ३) शहानवाज गफार हसन अन्सारी वय ३६ वर्षे रा— शिवनगर हौसिंग बोर्ड,रूम नंबर २२३, एम.एम.शाळेच्या बाजुला, अंबरनाथ (प) ४) सोहेब युन्नूस शेख वय २४ वर्षे रा. न्यु समृध्दी अपार्टमेंट, अे.विंग,रूम ००२, कोनगाव भिवंडी रोड, कोनगाव, ता.भिवंडी जिल्हा ठाणे ५) मुझाहिद अन्वर खान वय २४ वर्षे राहः— गुल मोहर अपार्टमेंट अे.विग, रूम नंबर ०२, तळमजला, फर्स्ट राबोडी ठाणे पश्चिम ६) शाहीद इसाक शेख वय १९ वर्षे राहः— समीर डी याचे मालकीच्या खोलीत, क्रांतीनगर, दुसरी राबोडी ठाणे यांना सदर गुन्हयात ताब्यता घेवुन त्यांचेकडुन सदर गुन्हयातील जबरी चोरी केलेली रोख रक्कम व गुन्हा करताना वापरलेल्या दोन मोटार सायकल असा एकुण ३६,४८,०००/— रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन, सदरचा गुन्हा २४ तासाचे आंत उघडकीस आणलेला आहे.नमुद गुन्हयाचा तपास चालु असुन आरोपीत यांची दिनांक २२/०९/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड देण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त ठाणे, मा. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व मा. श्री. शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त, (शोध—१) गुन्हे ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, पो.नि. महेश काळे, सपोनि/सर्जेराव पाटील, सपोनि/गणेश दळवी, पोउपनि/किरण भिसे, पोलीस अमलंदार दत्ताराम भोसले, बालाजी शिंदे, विजय जिरे, अदिक जाधव, दत्तप्रसाद महाजन, सुधीर कदम, सचिन भालेराव, पांडुरंग भांगरे, सचिन कदम, विलास कडु, गोरखनाथ पोटे, प्रंशात वानखेडे, उल्हास खंडारे, युवराज ठेपणे, प्रविण किनरे, गुरूनाथ जरग, विनोद चन्ने, मिथुन राठोड, गोरक्ष शेकडे, सतिश सोनवणे, गणेश हरणे, महिला पोलीस अंमलदार मंगल गावित, पुनम खरात, चालक सपोउपनिरी अमोल बोरकर यांचे पथकाने केलेली आहे.